दर्शनिका विभाग, मुंबई- यांच्याकडील शासकीय प्रकाशनांची विक्री खाजगी वितरकांमार्फत करण्यास व शासकीय प्रकाशनांवर ४० टक्के सवलत देण्यास मंजूरी मिळणेबाबत.

महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,
शासन निर्णय,क्रमांक: दर्शनि - २०१८/ प्र.क्र.३८/सांका.-२.
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १५ मार्च, २०१९.

संदर्भ : कार्यकारी संपादक व सचिव, दर्शनिका विभाग यांचे पत्र क्र.दर्श-५३८, दि. ९.५.२०१८.

प्रस्तावना :-

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या अधिपत्याखाली कार्यकारी संपादक व सचिव, दर्शनिका विभाग, मुंबई हे कार्यलय आहे. गॅझेटिअर प्रकाशनासाठी १९४९ मध्ये प्रथम मुंबई राज्य गॅझेटिअर बोर्डाची स्थापना झाली. दर्शनिका विभाग यांच्या वतीने ब्रिटीश कालखंडापासून आजपर्यंत जिल्हा व राज्य गॅझेटिअर तसेच भारतीय स्वातंत्र्य आंदोलन इतिहास आधारसाहित्य, स्वातंत्र्य सैनिक, चरित्रकोश, म.गांधी संकलित वाङ्मय अशा विविध मालिकांतर्गत मराठी व इंग्रजी भाषेतून गॅझेटिअर ग्रंथांची निर्मिती केली जाते. गॅझेटिअर ग्रंथ स्वरूपात व ई-बुक स्वरूपात उपलब्ध आहे.

शासनाच्या विविध विभागाच्या कार्यालयाकडून पत्रव्यवहाराने उपलब्ध होणाऱ्या माहिती आधारे तसेच प्रत्यक्ष सर्वेक्षण, मुलाखती व उपलब्ध मुळ संदर्भ साहित्य आधारे गॅझेटिअर चे लेखन करण्यात येते. सदर ग्रंथ (गॅझेटिअर) संपादक मंडळ सदस्य, कार्यालयातील अधिकारी यांच्याकडून तपासणी केल्यानंतर तो प्रकाशित केला जातो. यामुळे हा ग्रंथ एखाद्या ज्ञानकोशसदृश्य ग्रंथाचा दर्जा असलेला ग्रंथ आहे. ब्रिटिशकालीन गॅझेटिअर हे इंग्रजीत साधारणपणे १८७४ पासून निर्मित करण्यात आले तर याच ग्रंथाची सुधारित आवृत्ती १९४९ मध्ये करण्यात आली. साधारणपणे १९८२-८३ पासून महाराष्ट्रमध्ये अस्तित्वात असेलेले सर्व जिल्ह्यांचे गॅझेटिअर हे मराठीतून काढण्यात यावे असा निर्णय घेण्यात आला व त्याप्रमाणे इंग्रजीत असलेल्या मूळ जिल्हा गॅझेटिअरच्या आकृतीबंधामध्ये काहीसा बदल करून मराठी ग्रंथ अद्यायावत करण्यात आले. या ग्रंथात त्या-त्या जिल्हाचे ऐतिहासिक दृष्टीकोनातून, सामाजिक व ऐतिहासिक क्षेत्रात दिसून येणारे स्थित्यंतरे व दुरगामी बदल या माहितीचा अंतभार्व करण्यात येतो. जिल्ह्याचा ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा, भूगोल, लोक, अर्थव्यवस्था, प्रशासन, सामाजिक सेवा, वाहतूक व दळणवळण, उद्योगधंदे, प्रेक्षणिय स्थळे, कृषि व जलसिंचन, बॅक व्यवसाय, व्यापार व वाणिज्य अशा विविध १२ प्रकरणांचा आढावा वस्तूनिष्ठ माहिती आधारे उपलब्ध करून देण्यात येतो. या ग्रंथाचा उपयोग जनसामान्य, वाचक तसेच शासकीय कार्यालये, जिल्हा प्रशासन, विद्यापिठ पातळीवरील विद्यार्थी, प्राध्यापक तसेच देशातील व परदेशातील पर्यटकांना देखील त्या-त्या भागाचे ऐतिहासिक व सांस्कृतिक माहिती जाणून घेण्यासाठी महत्वपूर्ण ठरतो. हे शासकीय मौलिक ग्रंथ अधिकाधिक जनसामान्यांपर्यंत पोहोचावेत व या भूमीचे ऐतिहासिक आणि सांस्कृतिक महत्व येणाऱ्या नव्या पिढीला आकलन व्हावे यासाठी गॅझेटिअर अंत्यत उपयुक्त आहे.

शासन निर्णय :-

मुद्रण व लेखनसामग्री नियम पुस्तिकेतील परि.१४.४ अनुसार खाजगी वितरकांना शासकीय प्रकाशनांच्या किंमतीवर २५ टक्के सुट देण्यात येते. तथापि, जास्तीत जास्त सर्वसामान्य वाचकांना, अभ्यासकांना हे ग्रंथ अधिकाधिक सहज उपलब्ध व्हावे. यास्तव या शासन निर्णयान्वये पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या दर्शनिका विभाग या कार्यालयाकडून आतापर्यंत प्रकाशित झालेल्या व यापूढे प्रकाशित करण्यात येणाऱ्या सर्व प्रकाशानांची विक्री शासकीय मुद्रण, लेखण साम्रगी व प्रकाशन संचालनालयामार्फत नेमण्यात आलेल्या महाराष्ट्रातील व महाराष्ट्राबाहेरील अधिकृत विक्रीत्यांनमार्फत करण्यास व या विक्रेत्यांना सर्व प्रकाशनांवर ४० टक्के सवलत देण्यास या आदेशान्वये शासन मान्यता देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०३१५१६१३३०३१२३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Sawant Balasaheb Ishwar
Date: 2019.03.15 16:15:21 +05'30'

(बाळासाहेब ईश्वर सावंत)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. महालेखापाल महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परिक्षा), मुंबई.
२. महालेखापाल महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परिक्षा), नागपूर.
३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
४. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
५. मा. मंत्री (सांस्कृतिक कार्य विभाग), यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई.
६. प्रधान सचिव, सांस्कृतिक कार्य विभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
७. कार्यकारी संपादक व सचिव, दर्शनिका विभाग, मुंबई.
८. संचालक, शासन मुद्रण व लेखन साम्रग्री व प्रकाशन संचालनालय, चर्नी रोड, मुंबई.
९. सर्व अवर सचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०.सर्व कक्ष अधिकारी, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
११.निवड नस्ती -सां.का.२.